गडचिरोली
महासागर जिल्हा विशेष
सोमवार, दि. ६ जानेवारी २०२५


## यशोधरा कनिष्ठ महाविद्यालयात बालिका दिन साजरा

**चामोर्शीः** स्थानिक यशोधरा विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय चामोर्शी येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी वेशभूषा व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

सभेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य शाम रामटेके होते. प्रमुख अतिथी म्हणून सविता बारसागडे, तृप्ती कुकडकर, अश्विनी सोनटक्के, प्रतिभा सोनटक्के, ललिता सोनटक्के, काजल मशाखेत्री, चित्रांगी ढाक, गीता मशाखेत्री, हेमलता मशाखेत्री, शालू कुत्तरमारे, काजल लिंगे, मेघा गव्हारे, विद्यालयातील शिक्षकवृंद राजू धोडरे, प्रविण नैताम, गुरुदेव सातपुते, निलेश क्षीरसागर, लोकनाथ दुधबले, प्रा. प्रेमानंद वालदे, प्रा. प्रदिप भांडेकर, प्रा. प्रविण गव्हारे उपस्थित होते. यावेळी प्राचार्य शाम रामटेके यांनी सावित्री माईंच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा व त्यांच्या त्यागाचा आढावा घेतला. महिलांनी सावित्री माईचा वसा पुढे नेण्यासाठी पुढाकार घेऊन काम करण्याची गरज व्यक्त केली. याशिवाय सावित्री - ज्योतीरावांच्या त्यागाने मिळालेल्या शिक्षणरुपी संधीचे सोने करुन आपले जीवन सोनेरी करावे, असे आवाहनही विद्यार्थांना केले.

# १८८ वृध्द कलावंताच्या फायली ऑनलाईकरिता परत

## अर्ज मजुरीकरिता निवड समितीच्या सदस्यांवर राजकीय दबाव

**विशेष प्रतिनिधी**
**देसाईगंज दि. ५ :** 'वृद्ध कलावंत पेंशन योजनेत बोगस कलावंतांचा सुळसुळाट' या मथळ्याखाली दैनिक महासागरने वृत्त प्रकाशित करताच देसाईगंज तालुक्यातील तब्बल १८८ फायली अर्जदार कलावंतांना ऑनलाईन करण्याकरीता देसाईगंज पंचायत समितीला परत आल्याची माहिती अधिकृत सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. दरम्यान परत आलेले अर्ज मंजूर करण्याकरीता वृद्ध कलावंत जिल्हा निवड समितीचे सदस्य असलेल्यांवर अर्ज मंजूर करण्याकरीता राजकीय दबाव आणल्या जात असल्याचे एका निवड समितीच्या सदस्याने नाव न छापण्याच्या अटीवर माहिती दिली असल्याने दबाव आणणारे ते राजकीय पुढारी कोण? असा प्रश्न आता उपस्थित केल्या जाऊ लागला आहे.

आयुष्यभर आपल्या लोककलेच्या माध्यमातून साहित्य, कला या क्षेत्रात आयुष्य वेचलेल्या कलावंतांची वृद्धापकाळात दुरावस्था होऊ नये, करीता राज्याच्या सांस्कृतिक विभागा अंतर्गत वयाच्या ५० वर्षांपासून वृद्ध कलावंत पेंशन योजना अंमलात आणण्यात आली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी कलावंत महाराष्ट्र राज्याच्या रहिवाशी असावा, साहित्य किंवा कला क्षेत्रात किमान १५ वर्ष काम केलेला असावा, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६० हजारापेक्षा जास्त नसावे, शासनाच्या इतर योजनांचा लाभ घेत नसावा, अशा अटी व शर्थी पुर्ण करणाऱ्या कलावंतांने पंचायत समितीच्या माध्यमातून जिल्हा निवड समितीकडे अर्ज करावयाचा आहे.



कलावंताची या योजनेचा लाभ घेण्यासाठी निवड करतांना स्थानिक आमदार, पंचायत समिती सभापती, जिप सदस्य, तीन गावचे सरपंच तसेच पोलीस पाटलाचा कलावंत असुन १५ वर्षांपासून साहित्य किंवा कला क्षेत्रात कार्यरत असल्याबाबतचे प्रमापत्र जोडावयाचे आहे. मात्र, कागदपत्रे जोडतांना भजनी कलावंत गावापुरतेच मर्यादित असतांना अशांना कलावंतांच्या श्रेणीत जोडण्यासाठी स्थानिक लो. कप्रतिनिधींनी कुठलिही शहानिशा न करता प्रमापत्र दिले आहेत. या उपरही अर्ज बाद होऊ नये करीता कलावंत निवड समितीवर असलेले सदस्य अनेक संस्थांचे प्रती अर्ज १० हजार रुपये घेऊन प्रमापत्र जोडायला भाग पाडुन अर्ज पात्र ठरविण्यातही मौलिक भुमिका बजावत असल्याने या योजनेत जवळपास ८० टक्के बोगस कलावंतांचा शिरकाव झाल्याचे सांगितले जात आहे.

या योजनेच्या निवड समितीचे जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असुन आठ सदस्यांच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांची निवड करावयाची असतांना योजनेचा लाभ घेण्यासाठी करण्यात येत असलेला घोळ लक्षात घेता फायली ऑनलाईन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या फायली तपासण्यात आल्या असता यातील एकाही भजनी कलावंताने किमान १५ वर्षे या क्षेत्रात काम केलेले नसतांना तसेच नाट्य क्षेत्रातील अनेक कलावंतांनी एकाही नाटकात काम केलेले नसतांना नाटकांचे रितसर फोटो असलेले पांम्पलेट अर्जासोबत जोडल्याचे आढळून आले आहे. याबाबत सखोल चौकशी केल्यास अनेक धक्कादायक खुलासे होण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.दरम्यान याबाबत निवड समितीच्या काही सदस्यांना विचारणा केली असता चुप्पी साधत असल्याने समाज प्रबोधनाचे माध्यम असलेल्या कला क्षेत्राचे कलावंतच शासनाची फसवणूक करीत असतील तर अशांना प्रबोधन करण्याचा अधिक. रर आहे काय? असा प्रश्न आता उपस्थित केल्या जाऊ लागला आहे. निवड समितीचे सदस्य कला क्षेत्रात कार्यरत आहेत हे विशेष.

### बोगस लाभार्थ्यांचा शिरकाव, खऱ्या कलावंतावर अन्याय!

विशेष म्हणजे भारूड, खडी गंमत, कव्वाली, नाटक, गोंधळ, कथासार, नाटक, पोवाडे, किर्तन तसेच भजन गावागावात जाऊन कला सादर करणारे कलावंत सहज नजरेत भरत असतांना व किमान ५ वर्षे जरी कला तसेच साहित्य क्षेत्रात काम केले असल्यास ओळखल्या जात असतांना प्रत्येक गावात फक्त गावातील भजनाला हजेरी लावणारे या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरवीले जात असल्याने मोठ्या प्रमाणात बोगस लाभार्थ्यांचा शिरकाव होऊन ही योजनाच वांद्यात येण्याचे दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. यामुळे खऱ्या कलावंतांवर अन्याय होण्याची शक्यता असुन भविष्यात भजनी कलावंतांची गावेच्या गावे समाविष्ट होण्याची दाट शक्यताही वर्तवण्यात येत आहे.

## विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगावा: दास



**तालुका प्रतिनिधी**
**कोरची दि. ५ :** विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून संशोधनावर भर द्यावा, देशाचा विकास घडवून आणावा, असे प्रतिपादन कोरची पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अमित दास यांनी केले.

पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने कोरची तालुक्यातील बेतकाठी येथील धनंजय स्मृती विद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाच्या समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला बक्षीस वितरक म्हणून गटशिक्षणअधिकारी अमित दास, अध्यक्ष म्हणून धनंजय स्मृती विद्यालयाचे प्राचार्य पांडुरंग नागपुरे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून सुरज हेमके, सुरेश कार्टेंगे, रामकुमार नाईक, नरेश रामटेके, रेशमा कंगाली, देशमुख, उके, कापगते, भजने, वाघमारे आधी उपस्थित होते.

विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक खुला गटातून प्रथम क्रमांक दिलशान अजिज शेख (पारबताबाई विद्यालय कोरची), द्वितीय क्रमांक नेहा सुखरू दरवडे (युवास्पंदन विद्यालय भिंमपुर), तृतीय क्रमांक सृष्टी देविदास कराडे (जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मार्केकसा) व प्राथमिक आदिवासी गटातून प्रथम क्रमांक सानिया चितेला दर्रो (केंब्रिज केरला महडल स्कूल कोरची) यांनी पटकाविला.

माध्यमिक गटातून प्रथम क्रमांक क्रिश संतोष मेश्राम (अरुणा विद्यालय कोटरा), द्वितीय क्रमांक अनमोल विजय उंदीरवाडे (युवास्पंदन विद्यालय भिंमपुर), तृतीय क्रमांक योगेश गौतम सोनकुकरा (पारबताबाई विद्यालय कोरची) व माध्यमिक आदिवासी गटातून प्रथम क्रमांक वीसाताई अशोक मडावी(भगवंतराव हायस्कूल बोटेकसा)यांनी पटकावला. शिक्षक गटातून प्राथमिक शिक्षकातून प्रथम क्रमांक नरेश सिद्धार्थ रामटेके (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांदळी.) तर माध्यमिक गटातून प्रथम क्रमांक सुरज दिलीप हेमके (पारबताबाई विद्यालय कोरची) प्रयोगशाळा परिचर या गटामध्ये प्रथम क्रमांक यशपाल शेखावत (धनंजय स्मृती विद्यालय बेतकाठी) यांनी पटकाविला.

विज्ञान प्रदर्शनात एकूण ६३ प्रतिकृती आले होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरज हेमके, संचालन होमराज बिसेन तर आभार मानले.

## रोजगार हमी कामाचे पैसे तत्काळ मजुरांच्या खात्यात जमा करा

### कुरखेडा तालुक्यातील मजुरांची मागणी

**तालुका प्रतिनिधी**
**कुरखेडा दि. ५ :** तालुक्यात रोजगार हमीच्या कामाना गती आली असून कुरखेडा तालुक्यातील ७५ टक्के गावात रोजगार हमी योजनेअंतर्गत अनेक कामे सुरू आहे. या कामावर हजारो मजूर काम करीत आहेत. परंतु रोजगार हमी अंतर्गत काम केलेल्या मजुरांना कामाचे दाम एका महिन्यापासून मजुरांच्या खात्यात जमा होत नसल्याने मजूर चिंताग्रस्त झाला आहे. समोर मकर संक्रात येत असून अनेक महिलांना वान खरेदी करण्याकरिता तसेच घरात तिळगुळ, चिवडा, मुरमुरा, लाडू व नवीन साडी खरेदी करण्याकरिता पैशाची आवश्यकता असल्याने महिला वर्ग सुध्दा चिंताग्रस्त अवस्थेमध्ये दिसून येत आहेत. मकर संक्रांतीचा सण हा खास महिलांचा सण असून या सणामध्ये महिलांची बाजारपेठेमध्ये मुख्यता गर्दी दिसून येते.

मकर संक्रातीच्या या पावन पर्वावर सुरू झालेल्या रोजगार हमीच्या कामावर कुरखेडा तालुक्यातील ग्रामीण भागातील महिला रोजगार हमीच्या कामावर येत आहेत. परंतु काम करून एक महिन्याचा कालावधी लोटला असला तरी मजुरांच्या खात्यात रोजगार हमीचे पैसे जमा न झाल्याने शासनाप्रती कमालीची नाराजी व्यक्त केली जात आहे. जर एका हप्त्यात मजुरांच्या खात्यात पैसे जमा झाले नाही तर रोजगार हमी वरच्या स्त्री-पुरुष मजुरांची संख्या कमी होत जाऊन जोमात सुरू असलेल्या रोजगार हमीचे काम बंद होऊ शकते? त्यामुळे प्रशासनाने वेळीच दखल घेऊन रोजगार हमीच्या कामावर येत असलेल्या मजुरांचे पैसे तात्काळ त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावे, अशी एक मुखी मागणी कुरखेडा तालुक्यातील हजारो मजुरांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे.

## शांतीदूत संयोजकपदी नाजुक वाळके यांची निवड

**चामोर्शीः** एकता सामाजिक शिक्षण संस्था गडचिरोली महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विचार मंच - मुंबई यांचे वतीने तालुक्यातील आमगाव (म) येथील नाजूकराव वाळके यांची तालुका शांतीदूत संयोजक पदी एकमताने निवड करण्यात आली. महात्मा गांधी आंत. रराष्ट्रीय विचार मंच ( सत्य, शांती, अहिंसा आणि वैश्विक समानता) यानुसार गांधी शांती यात्रा आणि वैश्विक समानतेचे आयोजन करणे, सत्य, शांती, अहिंसा, विश्वबंधुत्व व आर्थिक उन्नती व समानतेवर कार्य करणे, प्रत्येक गावात व शहरात शांती दूत निर्माण करणे, पिंपळ, वड,नीम आदींचे वृक्षारोपण, नशा मुक्त परिवार आणि राष्ट्र निर्माण अभियान, बाल गांधी केंद्र अभियान, गांधी संमेलन यांचे आयोजन करणे, सर्वधर्म प्रार्थना सभेचे आयोजन, खोटे प्रचार धर्मांधता याविरुद्ध आवाज उठवणे अशा प्रकारचे अनेकविध कार्य सुचवण्यात आले आहे.

## अहेरी विधानसभा क्षेत्रात १० हजार सदस्यांची नोंदणी

### माजी खा. अशोक नेते यांची पत्रकार परिषदेत माहिती

**तालुका प्रतिनिधी**
**अहेरी दि. ५ :** भारतीय जनता पार्टी तर्फे १ जानेवारी ते १५ जानेवारी पर्यत देशभरात सदस्य नोंदणी मोहीम सुरू करण्यात आली असून आज ५ जानेवारीला विशेष सदस्यता मोहीम राबविण्यात येत आली. वरिष्ठ पातळीवरून अहेरी विधानसभा क्षेत्राचे पालक म्हणून माजी नियुक्ती करण्यात आली आहे. आज सकाळपासूनच आलापल्ली येथे विविध वर्गातील नागरिकांची सदस्य म्हणून नोंदणी केली आहे. अहेरी विधानसभा क्षेत्रात दहा हजार सदस्य नोंदणी झाल्याची माहिती भाजपाचे अनुसूचित जमाती आघाडीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व माजी खा. अशोक नेते यांनी पत्रकार परिषदेत दिली.



भाजपा हा जगातील सर्वात मोठा पक्ष असून या वेळी १५ कोटींच्या वर सदस्य नोंदणीचे लक्ष्य आहे. सदस्य नोंदणीसाठी स्मार्ट फोनच्या माध्यमातून नंबर डायल करून मिस कॉल देऊन मोबाईलवर संदेश येईल. आलेल्या लिंकमध्ये आपली संपूर्ण माहिती भरून सदस्यता घेता येणार आहे. अहेरी विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक बूथ वर कार्यकत्यांची बैठक घेऊन मोठ्या प्रमाणात सदस्यता नोंदणी मोहीम राबविण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी मोबाईल नेटवर्क उपलब्ध नाही त्या ठिकाणी कार्यकत्यामार्फत ऑफलाईन पद्धतीने फॉर्म भरून सदस्यता नोंदणी करण्यात येणार असल्याची माहिती नेते यांनी दिली. एकूणच कार्यकत्यामार्फत मोठ्या प्रमाणावर सदस्य नोंदणीचे लक्ष्य असल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेला प्रदेश उपाध्यक्ष ओबीसी सेल बाबूराव कोहळे, जिल्हा महामंत्री प्रकाश गेडाम, जिल्हा उपाध्यक्ष विनोद अक्कनपल्लीवार, मच्छिमार सेलचे अध्यक्ष मोहन मदने, जिल्हा सचिव पोशालू सुधरी, तालुका महामंत्री अभिजित शेंडे, सुकमल हलदार, अंकुश शेंडे, हर्षीत वर्मा, सागर बांबोळे आदींची उपस्थिती होती.

## जिप केंद्र शाळेत लुईस ब्रेल जयंती

**धानोराः** गटसाधन केंद्र धानोराच्या वतीने जिल्हा परिषद केंद्र शाळा धानोरा येथे अंधाचे जनक लुईस ब्रेल यांची जयंती ४ जानेवारी रोजी साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उच्च श्रेणी मुख्याध्यापक व्ही. के. शेडमाके उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक हिडको, सिडाम, गावंडे, कावळे, योगिता सहारे उपस्थित होते. तसेच गटसाधन केंद्र धानोरा येथील कर्मचारी दुगा, विशेष शिक्षक कीरंगे, पाटील व विशेषतज्ञ ब्राह्मणकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिडको यांनी केले तर प्रास्ताविक ब्राह्मणकर, आभार प्रदर्शन योगिता सहारे यांनी केले.

## कष्टाने पूर्ण झालेली स्वप्ने इतिहास घडवितात

### अरविंद पोरेड्डीवार यांचे प्रतिपादन : आरमोरीत प्रकाश चषकाचे थाटात उद्घाटन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. ५ :** खेळ म्हटलं की जय आणि पराजय होत असते. हार व जीत हे माणसाला घडवणारे दोन पैलू आहेत, वारंवार जीत हासील केल्याने व्यक्ती आत्मविश्वासी होते व पुढे जाऊन आदर्श ठरते. पण तितकेच महत्वाचे असते हार मान्य करणे. कारण जीत एकाची होणार हे माहीत असूनही जो व्यक्ती स्वतःला शेवटपर्यंत कसून मेहनत करायची जिद्द ठेवतो तोच खरा विजेता असतो. म्हणूनच पैशाने पूर्ण झालेली स्वप्न फक्त मरेपर्यंत टिकतात परंतु कष्टाने पूर्ण झालेली स्वप्ने हे इतिहास घडवितात, असे प्रतिपादन सहकार महर्षी तथा सर्वोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अरविंद सावकार पोरेड्डीवार यांनी केले.

युवामंच व प्रकाश चषक व मॉर्निंग ग्रुप आयोजन समिती आरमोरी यांच्या संयुक्त सौजन्याने आयोजित प्रकाश चषक भव्य टेनिस बॉल रात्रकालीन क्रिकेट स्पर्धा आरमोरी येथील क्रीडा संकुलामध्ये घेण्यात येत असून सदर स्पर्धेच्या




उदघाटन प्रसंगी उदघाटक म्हणून ते बोलत होते. दीपप्रज्वलक म्हणून गडचिरोली जिल्हा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रकाश सावकार पोरेड्डीवार, किसनराव खोब्रागडे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भाग्यवान खोब्रागडे होते.अध्यक्षस्थानी माजी आमदार कृष्णा गजबे तर प्रमुख अतिथी म्हणून आरमोरीचे ठाणेदार कैलास गवते, न.प.चे माजी उपाध्यक्ष हैदरभाई पंजवानी, भाजपचे जिल्हा महामंत्री सदानंद कुथे, भाजपाचे तालुकाध्यक्ष पंकज खरवडे, भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते श्रीहरी कोपुलवार, कृउबासचे सभापती ईश्वर पासेवार, नंदू पेट्ट. वार, डॉ. नीलकंठ मसराम, डॉ. अमोल धात्रक, अशोक ठकराणी, बि. टी. सेलोकर, माजी नगरसेवक माणिक भोयर,माजी सभापती नीता ढोरे,सुनीता चांदेवार, माजी नगरसे. विका गीता सेलोकर, सुनीता मने, मीनाक्षी गेडाम आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना अरविंद सावकार म्हणाले की,आज जगभरात क्रीडा प्रतिभेने देशाचे नाव प्रकाशमान करणारे बहुतांश खेळाडू हे अगदी सामान्य कुटुंबातील आणि ग्रामीण भागातील आहेत. आपल्या आदिवासी जिल्ह्यातही उत्तम खेळाडू असून, त्यांच्या खेळांना व कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रकाशभाऊंच्या मार्गदर्शनात युवामंचच्या कार्यकर्त्यांनी प्रकाश चषक क्रिकेट स्पर्धेचे तिसरे पर्व सुरू केले. हे त्यांचे कार्य अभिनंदनास पात्र आहे.

माजी आ. कृष्णा गजबे म्हणाले की, गोरगरिबांना मदत करणारा त्यांच्या हाकेला वेळोवेळी धाऊन जाणारा मंच म्हणजे आरमोरी येथील युवामंच होय. युवामंचचे पदाधिकारी दरवर्षी प्रकाश चषक भरवून केवळ जिल्ह्यातीलच नव्हे तर बाहेर जिल्ह्यातील खेळाडूंना क्रिकेटचे व्यासपीठ उपलब्ध करून देतात. त्यांचे कार्य अभिमानास्पद आहेत. कार्यक्रमाचे संचालन अक्षय हेमके,प्रास्ताविक भारत बावनथडे तर आभार विलास पारधी यांनी मानले.

### कार्यक्रमात यांचा झाला सत्कार

कार्यक्रमाचे औचित्य साधून युवामंचचे सदस्य केतन घोसे, अतुल नखाते, पवन कोकोडे, हेमंत कोपुलवार, अजय कुथें, यांना नोकरी लागल्याने तसेच याच मैदानावरून राष्ट्रीय स्तरावर गेलेले हॉकीपटू रितेश नागमोती, आयुष् गोन्नाडे व कबड्डी खेळाडू रोहित कोहाडे, खुशी नैताम, कुणाल देशमुख यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.




PNINO-MAHAMAR 2010585
महासागर गडचिरोली
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, एकदा मार्केट, चामोर्शी रोड, गडचिरोली येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१/९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र माहेश्वरी फोन ९९२२९७००३६/०७१३२२३२७७३ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहिल.)

गडचिरोली
महासागर जिल्हा विशेष
सोमवार, दि.६ जानेवारी २०२५


## शहरातील गुजरी परिसरात स्वच्छता मोहीम राबवा

**गडचिरोली:** शहरातील एकमेव गुजरीत भाजी विक्रेत्यांनी फेकून दिलेल्या निरुपयोगी भाजीपाल्याची स्थानिक प्रशासनाद्वारे वेळोवळी उचल केली जात नसल्याने गुजरी परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. या टाकाऊ भाजीपाल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे गुजरी परिसरात नगर पालिका प्रशासनाने दैनंदिन स्वच्छता मोहीम राबविण्यात नितांत गरज आहे.

शहरातील आठवडीबाजार रविवारी भरतो. मात्र इतर दिवशी भाजी विक्रेते स्थानिक गुजरीत बसतात. संपूर्ण आठवडाभराचा माल गुजरीलाच पाठविला जातो. मात्र बाहेरच्या जिल्ह्यातून आणलेल्या बहुतांश भाज्या सडतात, खराब होतात. स्थानिक विक्रेते हा खराब माल गुजरी आवारातच टाकून देतात. या टाकाऊ भाजीपाल्याची वेळीच उचल होत नसल्याने संपूर्ण गुजरी संकुलात घाणीचे साम्राज्य पसरलेले दृष्टीस पडते. हा टाकाऊ भाजीपाला खाण्यासाठी परिसरातील जनावरे गुजरी परिसरात ठाण मांडून राहतात.

# आदिवासी कुटुंबांचा उदरनिर्वाह वनोपजावरच!

### लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अनास्थामुळे खरेदी केंद्र उभारणीचा प्रश्न अडगळीत

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ५ :** प्रत्येक व्यक्तीला सुदृढ जीवन जगण्यासाठी किंवा नोकरीसह व्यवसाय वाढविण्यासाठी जगाचा सामना करावा लागतो. पण गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम क्षेत्रात वास्तव्याने असलेला आदिवासी हा एक असा समाज आहे, ज्यांच्यासाठी त्यांचे गावच त्यांचे विश्व आहे. विशेषतः स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतरही जंगलातून मिळणाऱ्या वनोपजावरच त्यांच्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह चालतो. या अतिसंवेदनशील भागात वास्तव्याने असलेल्या वनउपजावर जीवन व्यथित करणाऱ्या आदिवास. ींना रोजगाराचे माध्यम उपलब्ध करून देण्यासाठी वेळोवेळी वनउपजावर आधारित खरेदी केंद्र उभारण्याच्या बाता करण्यात आल्या. मात्र स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अनास्थेमुळे वनउपजावर आधारित खरेदी केंद्र आजही अडगळीत पडून आहे.



### आदिवासींचा संपूर्ण दिवस जंगलातच

जिल्ह्यातील जंगलांमध्ये बांबू, तेंदू फळ, मोह, हिरडा यासह विविध प्रकारचे वनोपज मुबलक उपलब्ध आहे. हे वनोपज गोळा करून आदिवासी उदरनिर्वाह करीत आले आहेत. या समाजातील बहुतांश नागरिक पहाटे जंगलाकडे धाव घेतात. दिवसभर वनउपज संकलित करून सायंकाळी घर गाठतात. परिसरात मोठ्या गावातील आठवडी बाजार गाठून वनउपज विक्री करतात. आदिवासी समाजातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असूनही त्यांचा मुख्य भर वनोपज गोळा करण्यावर राहतो.

### दुर्गम भाग सुविधांपासून वंचितच

जिल्ह्यात बहुसंख्य आदिवासी समाज वास्तव्याने राहतो. हा समुदाय दुर्गम, अतिदुर्गम क्षेत्रात मोडतो. या भागातील आदिवासीपर्यंत आजही मुलभूत सोयी- सुविधा पोहोचली नसल्याची विदारक स्थिती आहे. या भागातील अनेक गावात जाण्यासाठी पक्के रस्ते नाहीत. नदी, नाल्यांवर पूल नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीतही आदिवासी समाज वनावरच उदरनिर्वाह करीत आला आहे. सध्याच्या परिस्थितीत आदिवासी समाजात सुशिक्षित पिढी तयार होत आहे.

राज्याचा शेवटचा टोक असलेल्या आदिवासीबहुल गडचिरोली जिल्ह्यातील बहुतांश भाग दुर्गम, अतिदुर्गम क्षेत्रात मोडतो. या भागात आजही परंपरागत आदिवासी संस्कृती जपली जात आहे. या भागातील अनेक आदिवासीबांधवांचा बाहेरच्या जगाशी फारसा संबंध आलेला नाही. मागील अनेक वर्षांपासून या समुदायातील नागरिक वनात आढळून येत असलेल्या मोहफूल, हिरडा, बेहळा, चारोळी, बांबू, तेंद. ूपत्ता आदींसह जंगलात नैसर्गिकरित्या उपलब्ध होणारे वनउपज गोळा करीत आले आहेत. या वनउपजाची विक्रीतून ते कुटुंबीयांच्या गरजा भागवित आहेत. एकीकडे जगाने तंत्रज्ञानावर मोठमोठे पल्ले गाठले, तर दुसरीकडे राज्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या घनदाट जंगलात वास्तव्याने असलेल्या या आदिवास. ींना बाहेरच्या जगाशी काही देणे-घेणे नसल्याचे चित्र आहे.

बहुसंख्य आदिवासी वनउपजावर अवलंबून असताना प्रशासनाद्वारे या वनउपजावर आधारित खरेदी केंद्र उभारण्यात न आल्याने आदिवासींना अल्पदरात मौल्यवान वस्तूंची विक्री करावी लागत आहे. यातून त्यांची पिळवणूक होत असल्याचे स्पष्ट चित्र दिसून येते. वनविभागाने वनउपज खरेदीची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी गेल्या अने वर्षांपासून होत आहे. मात्र आजतागायत जिल्ह्यात कोठेही खरेदी केंद्र सुरू झाले नाही. परिणामी खासगी व्यापाऱ्यांकडून आदिवासींची लूट होत आहे. त्यामुळे वनविभागासह प्रशासन, शासनाने याकडे गांभीर्याने घेत वनावर आधारित खरेदी केंद्र तत्काळ सुरू करण्याची गरज आहे.

## मुधोली रिठ येथील अवैध दारूविक्री बंद करा

### ग्रामस्थांचे आष्टी पोलिसांना निवेदन

**तालुका प्रतिनिधी**

**चामोर्शी दि. ५ :** तालुक्यातील मुधोली रिठ येथे अवैधरित्या दारू व्यवसाय बिनधास्त सुरू असल्याने गावातील युवक दारूच्या आहारी गेल्याने त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. गावात दारू पिऊन झगडे-भांडण करतात, त्यामुळे गावातील नागरिकांनी अवैध होत असलेली दारू विक्री बंद करण्यात यावी, अशी मागणी मुधोली रिठ येथील नागरिकांनी आष्टी येथील पोलिस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

तालुक्यातील मुधोली रिठ येथील समर्थ देवतळे व वर्षा झाडे यांनी अवैधरित्या दारू व्यवसाय बिनधास्त करत असुन संपूर्ण युवक वर्ग नसेच्या आहारी गेलेले आहेत. कित्येकांना त्यांचा स्वताचा जिव सुद्धा गमवावा लागला आहे. तसेच गावात मद्यधुंद होऊन झगडे - भांडण करतात. त्यामुळे गावात कायदा सुव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यासाठी गावात अवैध्य व्यवसाय करीत असलेल्यांना वेळीच आवर घालून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. खुलेआम सुरू असलेली दारूविक्री तत्काळ बंद करण्यात यावी, अशी मागणी मुधोलि रिठ येथील तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सचिन चीताडे, उपसरपंच जिवन भोयर, राकेश भांडारवार, चेतन पाल, धनराज कस्तुरे, धोडूजी राऊत निवेदनात. ून केली आहे. निवेदनाची प्रत गडचिरोली पोलिस अधीक्षक गडचिरोली, चामोर्शी पोलिस निरीक्षक यांनाही पाठविण्यात आले.

## शासकरीय विश्रामगृहाची दुरवस्था कायम

**अहेरी :** स्थानिक शासकीय विश्रामगृहांची दुरवस्था झाली असून विश्रामगृहास परिसरात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण होवून दुर्गंधी पसरली आहे. परिणामी येथे ये-जा करणाऱ्या नागरिकांसह पदाधिकाऱ्यांनांही त्रास सहन करावा लागत आहे. विश्रामगृहात सद्यःस्थितीत दुर्गंधी परसलेली दिसून येत आहे. डासांचा उपद्रव वाढला आहे.

## नव्या पिढीने सावित्रीबाई फुलेंच्या विचारांचा अंगीकार करावा

### गीता हिंगेः अहेरीत सावित्रीबाई फुले जयंती उत्सव



**तालुका प्रतिनिधी**

**अहेरी दि. ५ :** सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना शिक्षण आणि स्वातंत्र्याचा अधिकार मिळवून दिला. सतीप्रथा, बालविवाह, यासारख्या अनिष्ट प्रथा नष्ट केल्या. विधवांचे केशवपन बंद करण्यासाठी नाव्ह्याचा संप सुध्दा पुकारला. अश्याप्रकारे शिक्षणासोबत सामाजिक क्रांती सुध्दा घडवून आणली. म्हणूनच अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेल्या महिलांना शिक्षणाची वाट मोकळी करून देणाऱ्या सावित्रीबाईंचे विचार आजच्या काळातही प्रेरणादायी आहेत. नव्या पिढीने त्यांच्या विच. ारांवर चालत सक्षमीकरणाच्या दिशेने पाऊले उचलावी. असे प्रतिपादन आधार विश्व फाउंडेशनच्या अध्यक्षा गीता हिंगे यांनी केले.

स्त्री शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाचा मंत्र देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४ वी जयंती तसेच राष्ट्रीय बालिका दिन क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले युवा संघर्ष समिती तथा युवा शक्ती गणेश मंडळ अहेरी यांच्या संयुक्त विद्यमाने अहेरी येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. उद्घाटक सामाजिक कार्यकर्त्या जयश्री नालमवार, होत्या. प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त रामचंद्र गुरनुले, वेलगुरचे उपसरपंच उमेश मोहुर्ले, अहेरीच्या नगरसेविका शालिनी पोहनेकर, सेवानिवृत्त शिक्षक अशोक निखुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाला अहेरी येथील बहुसंख्य महिला तसेच पुरुषांनी आपला सहभाग नोंदवून सावित्रीबाईंच्या विचारांना उजाळा दिला. कार्यक्रमाने सामाजिक बांधिल. कीचे नवे विचार प्रस्थापित केले आणि स्त्री मुक्तीचा सन्मान केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक गुरनुले तर आभार प्रदर्शन सागर गावतुरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश मोहूर्ले, मयुर पिपरे, अक्षय गुरनुले, त्रिनल लेनग. ुरे, अविनाश गुरनुले सहकार्य केले.

## विद्यार्थ्यांनी ‘माय भारत’ पोर्टलवर नोंदणी करावी

### प्रा. निलेश हलामी यांचे आवाहन



**शहर प्रतिनिधी**

**देसाईगंज दि. ५ :** माय भारत पोर्टल हा भारतातील तरुणांना सामा. जिक सहभाग, स्वयंसेवा आणि कौशल्य विकासाच्या विविध संधींशी जोडून त्यांच्या विकास आणि सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी समर्पित एक उपक्रम आहे. पोर्टल स्वयंसेवक क्रियाकलापांचा मागोवा घेण्यासाठी, कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आणि सहभागी होण्यासाठी आणि राष्ट्रीय सेवा प्रकल्पांमध्ये योगदान देण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करते आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी माय भारत पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन प्रा. निलेश हलामी यांनी केले.

आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील रासेयो विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम गहाणे यांच्या मार्गदर्शनात व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश हलामी यांच्या नेतृत्वात माय इंडिया आउटरीच कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यावेळी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. माझे भारत पोर्टल युवकांना त्यांची क्षमता सुधारण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देईल आणि त्यांना राष्ट्र उभारणीत सक्रिय भूमिका बजावण्याची चांगली संधी देईल. यामुळे एक व्यासपीठ उपलब्ध होईल, ज्याद्वारे युवक त्यांच्या कल्पना आणि योजना सामायिक करू शकतील. ज्यामुळे देशाला समृद्धीच्या दिशेने नेण्यास मदत होईल असे प्रा.निलेश हलामी यांनी सांगितले.

यावेळी माय भारत पोर्टलवरील नोंदणी प्रक्रियेची माहिती आणि त्यांना या पोर्टलचा लाभ घेण्यास आणि इतर तरुणांना त्यासाठी प्रेरित करण्याचे आव्हान त्यांनी केले. यामध्ये निवडलेल्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भारत सरकारने सुरू केलेल्या माय इंडिया कार्यक्रमाची तपशीलवार माहिती दिली. माय भारत पोर्टल या ऑनलाईन मंचाचा उद्देश युवकांचे सक्षमीकरण करणे आणि त्यांना त्यांच्या समाजात नेते आणि सक्रिय नागरिक होण्यासाठी प्रेरित करणे हा आहे, याची जाणीव प्रत्येक विद्यार्थ्याला व्हायला पाहिजे या उद्देशाने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. १५ ते २९ वयोगटातील तरुण या पोर्टलचा लाभ घेऊ शकतात असेही त्यांनी सांगितले.

कार्यशाळेला प्रा. हर्षा बगमारे, प्रा. प्रिती मेश्राम, प्रा.अनिल होळी, प्रा.जितेंद्र राऊत तसेच मोठ्या संख्येत रासेयो स्वयंसेवक व स्वंयसेविका व विद्यार्थी उपस्थित होते.

## पोलिस स्थापना दिनानिमित्त २०३ जणांनी केले रक्तदान

### देसाईगंज येथे महाराष्ट्र पोलिस स्थापना दिन व रेझिंग डे कार्यक्रम

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ५ :** महाराष्ट्र पोलिस दलाचे स्थापना दिन तथा रेझिंग डे चे औचित्य साधुन रविवार ५ जानेवारी रोजी देसाईगंज पोलिस स्टेशनच्या वतिने भव्य रक्तदान शि. बिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात एकूण २०३ जणांनी रक्तदान केले.

याप्रसंगी कुरखेडाचे उपविभागिय पोलिस अधिकारी रविन्द्र भोसले, देसाईगंजचे पोलिस निरिक्षक अजय जगताप, कुरखेडाचे पोलिस निरिक्षक महेंद्र वाघ, कोरचीचे शैलेन्द्र ठाकरे, देसाईगंजचे सहा. पोलिस निरिक्षक संदिप आगरक, मनिष गोडबोले, पोलिस निरिक्षक चेतन परदेशी यांचेसह पो. लिस दलाचे शिपाई कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.



महाराष्ट्र पोलिस स्थापना दिनाचे औचित्य साधुन गडचिरोली पोलिस विभागाच्या वतिने पोलिस प्रशासन व नागरिक यांच्यात सुसंवाद साधावा तसेच पोलिस विभागाच्या वतिने शासकिय योजनांची माहिती सर्वसामान्य जनते पर्यंत पोहचावी यासाठी रेझिंग डे च्या माध्यमातुन २ जानेवारी ते ८ जानेवारी पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. देसाईगंज पोलिस स्टेशनच्या माध्यमातुन २ जानेवारीला सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्रभारी सहा. पोलिस निरिक्षक संदिप आगरकर यांनी स्पर्धेत भाग घेणाऱ्या ५३ शालेय विद्यार्थ्यांना भेट वस्तु तसेच प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्याला रनिंग श्युज वितरित करण्यात आले. ३ जानेवारीला महिला सुरक्षा संदर्भात महाविद्यालयीन विद्यार्थिनींना सायबर गुन्ह्यांची माहिती व स्वरूताचे संरक्षण करण्या विषयी माहिती देण्यात आली. ४ जानेवारीला शहर स्वच्छता अभियान राबविण्यात आले तसेच प्रशासकिय कार्यालये, आरोग्य विभाग, महाविद्यालये, रेल्वे स्टेशन, बस स्थानक अश्या विविध ठिकाणी स्वच्छतेचे महत्व पटवुन दिले. आज ५ जानेवारी रोजी विशेष कार्यक्रम आयोजित करुन पोलिस दलातर्फे वृक्षारोपण व भव्य रक्तदान शि. बिराचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबिरात तब्बल २०३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाला पोलिस दलातिल कर्मचाऱ्यांसह नागरिकांनी उत्सफुर्त प्रतिसाद दिला. शिबिरात उपविभागिय पोलिस अधिकारी रविन्द्र भोसले यांनी स्वःता रक्तदान केले हे विशेष.

## विद्यार्थ्यांनी जाणली वाहतूक नियमांची माहिती

### मुरखळा येथे वाहतूक शाखेचा स्तुत्य उपक्रम

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ५ :** गडचिरोली पोलिस स्टेशन हद्दीतील मुरखळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखेच्यावतीने रेझिंग डे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान वाहतूक शाखेने विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांची माहिती देत नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले.

जिल्हा पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलिस अधीक्षक एम. रमेश (प्रशासन), उपविभागीय पोलिस अधिकारी जगताप, पोलिस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे यांच्या मार्गदर्शनात वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक शरद मेश्राम यांच्या चमूने पार पडलेल्या कार्यक्रमादरम्यान वाहतूक नियमांबाबत माहिती देताना विभागातील कर्मचाऱ्यांनी दुचाकी चालवताना हेल्मेटचा नियमित वापर करण्याचे सांगितले. स्वयंपूर्ण दिवे पाळा, वाहन चालवताना मोबाइलवर बोलू नये, ट्रिपल सीट दुचाकी चालवू नये, दारू पिऊन दुचाकी चालवू नये, असे सांगण्यात आले. विशेषतः अल्पवयीनद्वारे वाहन चालविण्याचे दुष्परिणाम त्यावर करावयाची कारवाई याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी वाहतूक कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे फलक दाखवून वाहतूक नियमांचे पालन कसे करावे, याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला वाहतूक विभागाचे पोलीस हवालदार मरगाये, पोरेटी, मुंडे, शेंडे, मुख्याध्यापक घोडाम, केंद्रप्रमुख मुपीडवार, पाटील, बत्ते, उसेंडी यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## रेल्वेच्या भूसंपादनावर शेतकऱ्यांमध्ये रोष

### योग्य मोबदला मिळत नसल्याचा आरोप

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ५ :** वडसा-गडचिरोली या रेल्वेमार्गाचे काम प्रगतिपथावर आहे. या रेल्वे मार्गाच्या उभारणीसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी हस्तांतरीत करण्यात आल्या होत्या. मात्र या भूसंपादनात साखरा गावातील शेतकऱ्यांनी योग्य मोब. दला मिळत नसल्याचा आरोप करत संताप व्यक्त केला आहे. यासंदर्भात विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर केल्याची माहिती त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेतून दिली.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वडसा ते गडचिरोली रेल्वे मार्गाला मंजुरी दिल्यानंतर उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत संपादित केलेल्या जमिनींना बागायती जमिनीसाठी १ कोटी आणि बिगर बागायत जमिनीसाठी ७४ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आश्वासन देत यादी प्रसिद्ध करण्यात आली. मात्र, प्रत्यक्षात बागायती जमिनीसाठी १२ लाख रुपये आणि बिगर बागायती जमिनीसाठी १० लाख रुपये भरपाई देण्यात आली. ग्रामस्थांनी जमिनी भूसंपादनास नकार दिल्याने त्यांच्यावर सक्तीची नोंदणी केल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे. बैठकीत ठरलेल्या दरानुसारच भरपाई देण्याची मागणी संबंधित शेतकऱ्यांनी केली. यासोबतच रेल्वेच्या माती कामामुळे पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे पिक. ांची एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी, तसेच वीज कनेक्शनचे खांब तुटले असल्याने शेतीला पाणी देण्यास अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे विद्युत खांब लावून देत तत्काळ कनेक्शन देण्यात यावे, अशी मागणी संबंधित शेतकऱ्यांनी केली आहे.

पत्रकार परिषदेला अभारिपचे प्रदेश उपाध्यक्ष रोहिदास राऊत, वासुदेव गायकवाड, ज्ञानदेव मेश्राम, चिंधु गेडाम, आनंदाव भैसारे, नामदेव लोहट, उनाजी चुधरी, लोमेश भानारकर, सदाशीव डोईजड, कौशल्या उंदिरवाडे, नरेंद्र वालदे, सुधाकर डोईजड, कमल अंबादे, नरेंद्र उंदिरवाडे, दुरिता अंबादे, ईश्वर डोईजड, हरबाजी वालदे आदी शेतकरी उपस्थित होते.

## गडचिरोली जिल्ह्यातील सरपंचांना संरक्षण द्या

**कुरखेडाः** बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच सरपंच आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या लोकप्रति. निधींना कायदेशीर संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी सरपंच संघटनेने गटविकास अधिकारी धीरज पाटील यांच्यामार्फत शासनाला पाठविलेल्या निवेदनातून करण्यात आली. निवेदन देताना तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष अशोक उसेंडी, सचिव मंगेश कराडे, कार्याध्यक्ष रोशन सय्यद, जिल्हा उपाध्यक्ष संदीप वरखडे, विजय तुलावी, सुषमा मडावी, सुप्रिया तुलावी, यमुलता पेंदाम, शोभा गावराणे, सविता कुमरे, मोहन पुराम, किरण आकरे, वासुदेव बहेटवार, गुरुदेव निकोडे, हरीराम चुरगाये, सुभाष डोमळे, रामसाय मडावी आदी उपस्थित होते.

# महिलांनी सजग राहून निर्णय घेणे काळाची गरज

### सरपंच संघटनेच्या जिल्हाध्यक्ष अपर्णा राऊत यांचे प्रतिपादन

**विशेष प्रतिनिधी**

**देसाईगंज दि. ५ :** महिलांसाठी शिक्षणाचे दारे खुले करून पुरुषाबरोबरीचे अधिकार मिळवून देणाऱ्या शैक्षणिक क्रांतिच्या आद्यजनक सावित्रीबाई फुलेंनी महिलांना सामाजिक, आर्थिक, न्यायिक अधिकार मिळवून दिले. अज्ञातात गुरफटलेली एक स्त्री आपल्या कित्येक पिढ्या बरबाद करू शकते तर सजग असलेली एक स्त्री आपल्या कित्येक पिढ्या नैतिकतेच्या प्रवाहात आणु शकते. ज्यामुळे समाजात नैतीकता रुजवणे शक्य आहे. त्यामुळे महिलांनी भावनेच्या भरात वाहुन न जाता सजग राहुन निर्णय घेणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन गडचिरोली जिल्हा सरपंच संघटनेच्या अध्यक्षा अपर्णा राऊत यांनी केले.



देसाईगंज येथील डॉ. बाबा. साहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पावन दिक्षाभुमिच्या सभागृहात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीनिमित्त सम्यक जागृत बौद्ध महिला समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय स्थानावरून बोलत होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्त्या कल्पना कापसे यांच्या हस्ते पार पाडण्यात आले. यावेळी प्रा.पल्लवी रामटेके, संगीता शेंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना कल्पना कापसे म्हणाल्या की, सामाजिक काम करणाऱ्या महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. असे असले तरी स्त्री ही क्षणिक सुखाची सोबतीन आणि अनंत काळाची माता असल्याने तिच्या जबाबदाऱ्या फार आहेत. महिलांना आई होण्याचे सौभाग्य प्राप्त झाले हे तिच्या कर्तृत्वावरून सिद्ध झाले पाहिजे, तरच ती खऱ्या अर्थाने आई ठरू शकते. यासाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगीतले.

कार्यक्रमाचे औचित्य साधून कार्यक्रमाच्या प्रथम सत्रात मार्गदर्शन व त्यानंतर ‘क्रांतिज्योती सावित्रीबाई विचार व कार्य’ या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यात प्रथम क्रमांक अश्विनी माने, द्वितीय क्रमांक सोमवती लंजे तर तृतीय क्रमांक मंगला रामटेके हिने पटकावला. प्रोत्साहन पर पारितोषिक मंदा शिंपोलकर यांनी पटकावला. कार्यक्रमाचे संचालन मोनिका अटाळकर यांनी, प्रास्ताविक सरीता बारसागडे तर आभार ममता जांभूळकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता यशोदा मेश्राम, रत्नमाला बडोले, प्रतिभा बडोले, लीना पाटील, आशा रामटेके, दुर्गा रंगारी, सुनीता नंदागवळी ममता रामटेके, प्रतिमा शेंडे, मारोती जांभूळकर, आशिष घुटके यांनी अथक परिश्रम घेतले.

## नोंदणी आयडी ग्रामपंचायतीवर उपलब्ध करा

### माजी आ. डॉ. नामदेव उसेंडी यांची मागणीः जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ५ :** मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळाने धान खरेदी नोंदणी आयडी ग्रामपंचायतस्तरावर उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी माजी आ. डॉ. नामदेव उसेंडी यांनी जिल्हाधिकारी अविश्यांत पांडा यांच्याकडे निवेदनातून केली आहे.

गडचिरोली जिल्ह्यात मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळातर्फे कृषी उत्पन्न बाजार समिती व आदिवासी सेवा सहकारी सोसायटीमार्फत धान खरेदी केंद्र चालविल्या जातात. सद्यस्थितीत धान विक्रीसाठी शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समिती व आदिवासी सेवा सहक. ारी केंद्रातच ऑनलाइन नोंदणी करावी



लागते. गडचिरोली जिल्हा हा क्षेत्रफळाने विस्तृत असून अतिदुर्गम लांब ठिकाणाहून नोंदणी केंद्रावर शेतकऱ्यांना नोंदणी करण्यासाठी यावे लागते. त्यामुळे केंद्रावर शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. गर्दीमुळे एका दिवसात नोंदणी होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना तीन ते चार दिवस फेऱ्या माराव्या लागतात. त्यातच नोंदणी करून घेण्यासाठी कधी वाम मार्गाचा उपयोग होतो. निश्चित कालावधीत नोंदणी होत नसल्याने शासनाला वारंवार नोंदणीसाठी मुदतवाढ द्यावी लागते. मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळाने धान खरेदी नोंदणी आयडी ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करून दिल्यास स्थानिक ग्रामपंचायत स्तरावर शेतकरी धान विक्रीची नोंदणी करुन योजनेचा लाभ घेतील. शासनाला वारंवार नोंदणीसाठी मुदतवाढ करण्याची आवश्यकता भासणार नाही, अशी मागणी माजी आ. डॉ. उसेंडी यांनी जिल्हाधिकारी पांडा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी रमेश भुरसे, विलास भांडेकर, अविनाश विश्रोजवार, बंडू झाडे उपस्थित होते.

